दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ शनिवार, ०७ मार्च २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३२७ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक घोषणा, दोन लाखांपर्यंत कर्जमाफी होणार, मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** महायुतीने राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यासाठी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापनाही केली होती. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याची घोषणा करणाऱ्या फडणवीस सरकारने फक्त दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे. फडणवीस



सरकारने कर्जमाफीचा शब्द पाळला नाही, असा आरोप शेतकरी संघटनांकडून केला जात आहे.

फडणवीस सरकार सत्तेत आल्यापासून राज्यातील शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाकडे डोळे लावून बसला होता. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पण तो अपुरा आहे. फडणवीस (Devendra Fadnavis) यांनी शुक्रवारी आगामी आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मांडताना कृषी कर्जमाफीच्या (Loan Waiver Scheme) निर्णयाची घोषणा केली.

आम्ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी (Farmers) कर्जमाफी योजना राबवण्याचं आश्वासन दिलं होते. त्यासाठी समिती गठीत केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ केले जाईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना, असे नव्या कर्जमाफी योजनेचे नाव असेल. जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार असल्याचेही फडणवीस यांनी अर्थसंकल्पात जाहीर केले आहे.कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबत राज्यातील बँकिग यंत्रणा सक्षम असावी, यासाठी समितीच्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात येईल.

शेतकरी वारंवार कर्जबाजारी न होता त्याला कायमचा कर्जमुक्त

करण्याचा सरकारचा संकल्प आहे. समितीच्या शिफारसीनुसार दीर्घकालीन उपाययोजन केल्या जात आहेत, असेही फडणवीस यांनी सांगितले.

**विरोधाची धार तीव्र होणार**


महायुती सरकार सत्तेत आल्यापासून विरोधकांकडून महायुती सरकारला शेतकरी कर्जमाफीच्या योजनेचे काय झाले, असा जाब विचारत होते. त्यासाठी वेळोवेळी आंदोलन झाली आहेत.

निवडणूक झाल्यानंतर सरकार शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन विसरले, अशी टीकाही झाली होती. मात्र, फडणवीस यांनी कर्जमाफीची घोषणा करूनही शेतकऱ्यांना पूर्ण दिलासा मिळाला नाही. संपूर्ण कर्जमाफीची मागणी असताना दोन लाखांपर्यंचेच कर्जमाफ होणार आहे. त्यामुळे शेतकरी संघटना पुन्हा आक्रमक होण्याच्या तयारीत आहेत.

## डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी आकाश वाघमारे

महाराष्ट्र जीत

**भगूर प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :'** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव निमित्त तरुण मित्र मंडळ केथे कॉलनी येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात जल्लोषात दरवर्षी साजरी करण्यात येते . याही वर्षी मंडळाच्या वतीने बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती आगळयावेगळ्या पद्धतीने



साजरी करण्याचा एकमताने निर्णय झाला या मंडळाच्या वतीने अध्यक्षपदी सागर वाघमारे उपाध्यक्ष अनिकेत नेटावटे कार्याध्यक्ष शुभम भेनवाल खजिनदार भीमराज साळवे यांची निवड करण्यात आली ही कार्यकारणी निवडल्यानंतर जयंती सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून करण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले यावेळी प्रहार संघटनेचे जेष्ठ नेते जेकप अण्णा पिल्ले यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या

## लालबाग मेघवाडी येथे शिवजयंती उत्साहात साजरी !!

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** मेघवाडी–लालबाग येथील बाल विकास मंडळाच्या वतीने ६८ व्या शिवजयंती उत्सव उत्साहात संपन्न झाले. ज्येष्ठ पत्रकार शशिकांत सावंत आणि ज्येष्ठ साहित्यिक व कवी विलास देवळेकर यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन करण्यात आले. शुक्रवार दिनांक ६ मार्च२०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता



करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ कवी विलास देवळेकर यांनी कोकणी शैलीत शिवरायांप्रती काव्यात्मक भाव व्यक्त करत बाल विकास मंडळ, मेघवाडी यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून मंडळाला शुभेच्छा दिल्या. तसेच ज्येष्ठ पत्रकार शशिकांत सावंत यांनी शिवाजी महाराज यांचे कर्तुत्व व शौर्य कार्य मनोगतातून व्यक्त केले. बाल विकास मंडळ गेल्या ७४ वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करत आहे. मंडळाच्या कार्याला संस्थापक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व आप्पासाहेब तोडणकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते. मंडळाच्या सदस्यांचे समर्पण आणि स्थानिक नागरिकांचे मिळणारे पाठबळ यामुळे मंडळाची सामाजिक वाटचाल अधिक बळकट होत असल्याचा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला. मंडळाचे अध्यक्ष सरचिटणीस यांच्यासह अनेक मान्यवर व शिवप्रेमी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांतून समाजात स्वाभिमान, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळत राहावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले.

## मुरमा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय शिबिराचा शुभारंभ

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे /पाचोड :** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाचोड आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत मौजे मुरमा, ता. पैठण येथे सात दिवसीय विशेष शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यंदाच्या शिबिराची थीम "पर्यावरण, शिक्षण आणि जागरूकता" अशी ठेवण्यात आली आहे. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जि. प. सदस्य शिवराज भुमरे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे होते.

यावेळी मुरमा गावच्या सरपंच सौ. उषा दिनकर मापारी तसेच जिल्हा



परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सुमनांजली बनसोडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शिबिराचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना समाजसेवेची जाणीव ठेवून गावाच्या विकासासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

या सात दिवसीय शिबिरामध्ये स्वयंसेवक विद्यार्थ्यांकडून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. दररोज सकाळच्या सत्रामध्ये गाव परिसरात स्वच्छता अभियान, वृक्षारोपण व इतर सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून श्रमदान केले जाणार आहे. दुपारच्या सत्रात तज्ज्ञ व्याख्यात्यांची बौद्धिक सत्रे आयोजित करण्यात आली असून त्यामध्ये पर्यावरण संरक्षण, शेतीतील समस्या, बालविवाह निर्मूलन, सामाजिक जागरूकता आदी महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे तसेच शिबिराच्या संध्याकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून त्यातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, पर्यावरणाबाबतची जाणीव आणि ग्रामीण विकासासाठीची प्रेरणा निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमांना गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. ह. सो.बिडवे यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संतोष चव्हाण यांनी केले तर आभार डॉ.भगवान जायभाय यांनी मानले यावेळी उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ.विलास महाजन डॉ.सुरेश नलावडे डॉ. हेमंत कुमार जैन डॉ.गांधी बानायत डॉ.उत्तम जाधव प्रा.विनोद कांबळे प्रा.सचिन कदम प्रा.अरुणा दसपुत डॉ.विठ्ठल देखणे प्रा. नितीन चित्ते स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित झाल्यानंतर नगरपंचायतीला जाग

### संरक्षक भिंतीच्या निकृष्ट बांधकामावर हातोडा

महाराष्ट्र जीत

**पालघर - श्री तुषार भोईर :** नगरपंचायत मार्फत सिद्धेश्वर नदीच्या किनाऱ्यालगत बांधलेल्या संरक्षक भिंतीचे बांधकाम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याने यासंदर्भात विधानपरिषदेत आमदार अनिल परब यांनी प्रश्न उपस्थित केल्याने धाबे दणाणलेल्या नगरपंचायतीने तातडीने शुक्रवारी ( दि. ६) ह्या बांधकामावर हातोडा उगारला.हे बांधकाम पोकलनद्वारे तोडण्याची कारवाई करण्यात आली.

वाडा नगरपंचायतीमार्फत शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सिद्धेश्वर बंधाऱ्यालगतच्या नदी किनाऱ्याला संरक्षक भिंत बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे बांधकाम करताना ठेकेदाराने या बांधकामात लोखंडी सळया न वापरता दगडांचा वापर करत अत्यंत निकृष्ट बांधकाम केले होते. यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिवसेनेचे (उबाठा) आमदार अनिल परब यांनी विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रश्नावर १० मार्च पर्यंत उत्तर देण्याच्या सूचना नगरपंचायत प्रशासनाला मिळाल्यानंतर





जाग आलेल्या नगरपंचायत प्रशासनाने तातडीने हे निकृष्ट बांधकाम तोडण्याची कारवाई सुरु केली आहे. मात्र अशाप्रकारचे निकृष्ट दर्जाचे सुमारे १०० मीटर लांबीचे बांधकाम होत असताना नगरपंचायत प्रशासन डोळयावर पट्टी बांधून होते का? असा सवाल उपस्थित केला जात असून आता अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाल्यानंतर कारवाईचा बडगा उगारला गेल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## अकबर शेख यांची ‘संपादक पत्रकार असोसिएशन, महाराष्ट्र राज्य’च्या महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती

महाराष्ट्र जीत

**श्रीरामपूर (प्रतिनिधी) –** श्रीरामपूर येथील पत्रकार अकबर शेख यांची "संपादक पत्रकार असोसिएशन, महाराष्ट्र राज्य" या संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इस्माईल एस. शेख यांनी प्रदान केले.अकबर शेख हे श्रीरामपूर (ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील रहिवासी असून ते पत्रकारिता क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत



आहेत. त्यांच्या पत्रकारितेतील कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे.सदर नियुक्ती ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत वैध राहणार असून, त्यांच्या कार्याची गुणवत्ता व कार्यक्षमता लक्षात घेऊन भविष्यात पुढील पदाबाबत विचार करण्यात येणार असल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.या पदाच्या माध्यमातून अकबर शेख यांनी पत्रकार बांधवांच्या हितासाठी, तसेच संघटनेच्या उद्दिष्टानुसार पत्रकारिता क्षेत्रात सकारात्मक व विधायक कार्य करावे, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, या नियुक्तीबद्दल अकबर शेख यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## जागतीक महीला दिना निमीत्त डॉ सुक्ष्मा उपाध्ये यांचे ती घडविते आयुष्य या विषयावर मार्गदर्शन संपन्न

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** जागतीक महीला दिनाचे औचीत्य साधत आमदार श्रीमती सईताई प्रकाश पाटील डहाके यांचे पुढाकारात विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .कारंजा पंचायत समीती व शिक्षण विभागाचे समन्वयाने दि . ५ मार्च रोजी विद्याभारती कनीष्ठ महाविद्यालय कारंजा येथे ती घडविते आयुष्य या





विषयावर काजळेश्वर निवासी डॉ सुक्ष्मा विशाल उपाध्ये यांचे सकाळचे सत्रात व्याख्यान संपन्न झाले .

यावेळी व्यासपीठावर सामाजीक कार्यकर्त्या सौ तेजूताई डहाके; बीडीओ राणे मॅडम; उपप्राचार्य रोकडे मॅडम; प्रविण कानकिरड; संतोष चौधरी; राजगुरे सर ; व्याखाता डॉ सौ .सुक्ष्मा उपाध्ये यांची प्रमुख उपस्थीती होती . प्रथम मॉसाहेब जीजाऊ; सावीत्रीबाई फुले यांच्या प्रतीमाचे पूजन उपस्थीतांनी करुन त्यांना अभिवादन केले . व्याख्याता डॉ सौ सुक्ष्मा उपाध्ये यांचा सन्मान आयोजन समिती कडून करण्यात आला . याप्रसंगी महिलांचे आरोग्य याविषयावर डॉ सौ सुक्ष्मा उपाध्ये यांनी मागदर्शन केले जीवन जगत असतांना महिलांनी आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे . स्त्री जर निरोगी असेल तर ती कशी भविष्य घडविते याबाबत विस्तृत सुंदर विवेचन आपल्या व्याख्यानातून डॉ उपाध्ये यांनी केले . याप्रसंगी महीला वर्ग तसेच कनीष्ठ महाविद्यालयात शिकनाऱ्या मुलींची मोठ्या संख्येने उपस्थीती होती .

दैनिक **महाराष्ट्र जीत** शनिवार, ०७ मार्च २०२६



## संपादकीय

### विनाशकाळातील विश्वासू

सध्याच्या इराण-इस्रायल युद्धात भारताच्या परराष्ट्र धोरणाची अवस्था पाहून काही वर्षांपूर्वीच्या एका जाहिरातीतील ''ये क्या हाल बना रक्खा है'' या वाक्याची आठवण आल्यास ते अयोग्य ठरवता येणे अवघड. असे का म्हणायचे याची काही उदाहरणे.

भारताजवळील समुद्रात अमेरिकेने इराणची युद्धनौका बुडवली. त्यातील ८५ इराणी नौसैनिकांना जलसमाधी मिळाली. म्हटले तर अमेरिकी नौदलाचे हे शौर्यकृत्य. पण तसे ते का नाही, हा प्रश्न. तो निदान आपण विचारायला हवा. याचे कारण ही नौका भारतात आली होती ती अमेरिका, इराण, भारतादी देशांच्या नौदल कवायतीत सहभागी होण्यासाठी. आपल्या विशाखापट्टणम् येथे ती नांगरली गेली होती आणि या इराणी सैनिकांनी त्या शहराचा पाहुणचारही अनुभवला. स्थानिकांशी संवाद साधला. हे सर्व अर्थातच युद्ध सुरू होण्यापूर्वी. ते सुरू झाल्यावर ही नौका मायदेशी रवाना झाली असता अमेरिकी पाणबुड्यांनी तिचा वेध घेतला आणि ती बुडवली. संपूर्ण जगभरातून या घटनेचा निषेध केला जात असून अमेरिकेचे हे कृत्य भारतीय सार्वभौमत्वाचा भंग आहे किंवा कसे, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्या शंका आपण फेटाळल्या. ते ठीक. पण यातील तपशिलाचा भाग असा की ही नौका शांतताकालीन नौदलीय कवायतीत सहभागी होण्यासाठी आलेली होती. आपली पाहुणी होती. म्हणजे एरवी 'वसुधैव कुटुंबकम्' वगैरेचा संदेश जगास देणाऱ्या भारताने या नौकेच्या रक्षणाची जबाबदारी घेण्याची गरज नसली तरी तिच्या बुडवण्याचा निषेध तरी करायला हवा? तसे आणि तितकेही काही झाल्याचे ऐकिवात नाही.

दुसरे उदाहरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इस्रायल दौऱ्याचे. हा दौरा त्या देशाचे पंतप्रधान नरसंहारक नेतान्याहू यांनी खूप वाजवला आणि गाजवला. पाहुण्या पंतप्रधानांकडून इस्रायली संसदेत केनेसेटमध्ये, स्वत:चे गुणगौरव होण्याची चोख व्यवस्था त्यांनी केली. त्या स्तुतिसुमनांच्या बदल्यात भारतीय पंतप्रधानांच्या गौरवासाठी आतापर्यंत नसलेले प्रयोजन तयार केले. सोहळा छान पार पडला. आतापर्यंतच्या अनुभवानुसार पाठोपाठ काही विशिष्ट भारतीय कंपन्यांचे पंतप्रधानांनी भेट दिलेल्या देशाशी अथवा त्या देशातील कंपन्यांशी यथासांग करार-मदार होतीलही. पण यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे भारतीय पंतप्रधानांची पाठ वळते न वळते तोच इस्रायलने 'भारताचा मित्र' असलेल्या इराणवर चढाई केली. म्हणजे मोदी हे इस्रायलमध्ये असतानाच या चढाईची तयारी झालेली असणार. भारताच्या आंतरराष्ट्रीय मित्रावर आपण हल्ला करणार आहोत हे नेतान्याहू यांनी मोदी तेथे असतानाच ठरवलेले असणार. पण त्यांनी या अशा हल्ल्याची कसलीही जाणीव भारतीय पंतप्रधानांस करून दिल्याचे अद्याप ऐकिवात नाही. तत्त्वत: तसे करण्याची गरज नाही हे खरे. हा युक्तिवाद कायदेशीरदृष्ट्या बरोबर असेलही. पण मैत्री कायदे-कानूनाने चालते काय? नरसंहारी नेतान्याहू हे तर आपल्या पंतप्रधानांचे जीवश्च मित्र. या मैत्रीच्या नात्यातून त्यांनी भारतास विश्वासात घ्यायला हवे होते. ते तसे करते तर त्याचा गवगवा मोठा झाला असता. तसा तो होत नसल्याने नरसंहारी नेतान्याहू यांनी भारताच्या भावनांची फिकीर केली नाही असा निष्कर्ष निघाल्यास तो अयोग्य नाही.

त्यानंतर तब्बल सहा दिवसांनी आपण इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली वाहिली. वास्तविक इराण हा आपला 'ब्रिक्स' संघटना सदस्य. यात आपणच असे आहोत की आपल्या सहसदस्य देशाच्या सार्वभौमत्वावर अमेरिका-इस्रायल यांनी घातलेल्या घाल्याचा कडकडून निषेध केलेला नाही. या संघटनेत दक्षिण आफ्रिकाही आहे. तोही आपल्यासारखा विकसनशील गटातीलच. पण त्या देशाने तर नरसंहारी नेतान्याहू यांच्यावर आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला गुदरण्याची हिंमत दाखवली. आपणासाठी हे फारच झाले असते हे मान्य. पण निदान एखाद्या सार्वभौम देशाच्या निर्णयस्वातंत्र्यावर कोणी एक मस्तवाल कोणा एका गावगुंडाच्या साहाय्याने हल्ला करत असेल तर जगातील चवथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था, 'लोकशाहीची जननी' इत्यादी असलेल्या भारताने अमेरिका-इस्रायल यांचा किमान निषेध तरी करणे हे माणुसकीस धरून झाले असते. बरे, इराण म्हणजे मुसलमानी असला तरी पाकिस्तान नव्हे.

# शिवभक्त संजय दादा भालेराव आयोजित मुंबई मधील सर्वात मोठा

## शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा ! अवघे वातावरण झाले शिवमय

महाराष्ट्र जीत

**घाटकोपर,(केतन भोज) :** माजी नगरसेवक शिवभक्त संजय दादा भालेराव यांनी गनिमी कावा करत घाटकोपर पश्चिम अमृत नगर सर्कल याठिकाणी २७ मार्च २०१६ रोजी शिवजयंती दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वरूढ मूर्तीची स्थापना केली.तसेच शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या संकल्पनेतून तसेच निधीतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याच्या ठिकाणी सुशोभीकरण करून शिवस्मारक बांधण्यात आले.तेव्हा पासून याठिकाणाला एक वेगळी ओळख व वेगळे महत्त्व मिळाले असून याठिकाणाला छत्रपती शिवाजी महाराज चौक,अमृत नगर असे नाव देण्यात आले. याचे सर्व श्रेय शिवभक्त संजय दादा भालेराव यांचे असून तेव्हा पासून दरवर्षी शिवस्मारक समितीचे संस्थापक/अध्यक्ष तथा माजी नगरसेवक शिवभक्त संजय दादा भालेराव हे याठिकाणी तिथी दिवशी मोठ्या उत्साहात शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करतात.घाटकोपर मधीलच नाही तर मुंबई मधील सर्वात मोठा शिवजन्मोत्सव सोहळा हा फक्त घाटकोपर मध्ये शिवभक्त संजय दादा भालेराव हे साजरा करतात.तेव्हापासून हे शिवस्मारक घाटकोपर मधील हजारो तरुणांचे शक्तिस्थान बनले आहे.





यावेळी शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या आदल्या रात्री म्हणजे गुरुवार दि.०५ मार्च रोजी मध्यरात्री ठिक बारा वाजता शिवस्मारक समितीचे संस्थापक/अध्यक्ष तथा माजी नगरसेवक शिवभक्त संजय दादा भालेराव तसेच नगरसेविका डॉ.सौ.अर्चना संजय भालेराव यांच्या नेतृत्वाखाली हस्ते हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांची शिव महाआरती करण्यात आली.यावेळी 'जय भवानी,जय शिवराय' असा जयघोषात अवघे वातावरण शिवमय झाले होते.तसेच फाल्गुन कृ.दि.०६ मार्च रोजी तिथी प्रमाणे शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ साजरा करण्यात आला असून सकाळी ठिक ८.वा.शिव अभिषेक,शिव वंदना,आरती व पुजा करण्यात आली,त्यानंतर सायंकाळी पुन्हा ७.वाजता हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत शिव महाआरती करण्यात आली.यावेळी शिव स्मारकाला आकर्षक फुलांनी सजवण्यात आले होते.तसेच शिवस्मारकाला केलेल्या आकर्षक रोषणाई तसेच लेझर शो मुळे शिवस्मारकाचे तेज डोळ्याचे पारणे फेडत होते.शिवजन्मोत्सव दिवशी दिवसभर याठिकाणी साहसी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके आणि ढोल - ताशा पथकांचे स्फूर्तिदायक वादन,पारंपारिक वेशभूषेत नटलेले आबालवृद्ध,..'जय भवानी,जय शिवाजी' असा जयघोष..अग्रभागी असणारी शिवज्योत आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वरूढ पुतळा अशा स्फूर्तिदायी आणि शिवमय वातावरणात शिवस्मारक समितीचे संस्थापक/अध्यक्ष शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या नेतृत्वाखाली तसेच सर्व हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत शिवछत्रपतींना मानवंदना देण्यात आली. यावेळी घाटकोपर मधूनच नाही तर मुंबईच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवभक्त या शिवजन्मोत्सव सुवर्ण सोहळयामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत असतात.

त्यामुळे हा शिवजन्मोत्सव सोहळा घाटकोपर मधीलच नाही तर मुंबई मधील सर्वात मोठा शिवजन्मोत्सव नावाजला जातो.

यावेळी शिवस्मारक समिती- शिव आरती संघ,घाटकोपरच्या सर्व शिवभक्तांनी या शिवजन्मोत्सव सोहळ्यासाठी कठोर परिश्रम घेतले.

## जागतीक महिलादिना निमीत्त आमदार सईताई डहाके यांचे पुढाकारात विवीध कार्यक्रमाचे आयोजन



महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा:** जागतीक महीला दिनाचे औचित्य साधत कारंजा मानोरा विधानसभा क्षेत्राचे आमदार श्रीमती सईताई डहाके यांचे पुढाकारात विवीध कार्यक्रमाचे आयोजन दि.४ ते ८ मार्च रोजी करण्यात आले . विद्याभारती कनीष्ठ महाविद्यालय कारंजा येथे महिलाचेआरोग्य या विषयावर डॉ सुषमा उपाध्ये यांनी दि५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता मार्गदर्शन केले .वृत्त असे जागतीक महीला दिनाचे औचित्याने आ . श्रीमती सईताई प्रकाश डहाके यांचे पुकारात दि ४ मार्च रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र पोहा येथे आरोग्य शिबीर संपन्न झाले तर दि ५ मार्चरोजी विद्याभारती कनीष्ठ महाविघालय कारंजा येथे आमदार श्रीमती सईताई डहाके यांचे मार्गदर्शनात शिक्षण विभाग पंचायत समीती कारंजा यांनी आयोजीत ती घडविते आयुष्य व महीलांचे आरोग्य या विषयावर डॉ सुषमा उपाध्ये यांचे उत्कृष्ठ व्याख्यान व मार्गदर्शन सादर झाले . प्राथमिक आरोग्य केंद्र खडी धामणी येथे आरोग्य शिबीर घेण्यात आले . दि ६ मार्च रोजी पंचायत समीती हॉल येथे सकाळी स्त्री जन्मा तुझी कहाणी विषयावर रांगोळी स्पर्धा तर प्राथमिक आरोग्य केंद्र मनभा यथे आरोग्य शिबीर घेण्यात आले दि७ मार्च रोजी सकाळी पंचायत समीती हॉल कारंजा येथे मी सावीत्री बोलतोय; मी जीजाऊ बोलतोय; मी रमाई बोलतोय; माझे हक्क माझी ताकद एकपात्री नाटीकेचे आयोजन केले आहे . संध्याकाळी नागवाणी शाळेजवळील ब्रम्हा कुमारीज केंद्रावर महीला दिनाचा उत्सव साजरा केल्या जाईल तर दि ८ मार्च रोजी सकाळी प्राथमिक आरोग्य केंद्र धनज बु।। येथे आरोग्य शिबीर आयोजीत असून दुपारी ३वाजता शेतकरी निवास येथे सन्मान स्त्री कर्तृत्वाचा; जागर स्त्री शक्तीचा; स्त्री सन्मान सोहळा व बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार आहे . तेव्हा या सर्व कार्यक्रमाचा लाभ गरजूंनी घ्यावा व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थीती द्यावी असे आवाहन आमदार सईताई प्रकाश पाटील डहाके प्रसद्धी पत्राद्वारे केले आहे .

## ब्रम्हा कुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय तथा ग्रामवासीकडून माजी प्राचार्य अशोकराव उपाध्ये यांचा सन्मान

**कारंजा केंद्र संचालिक बीके मालती दिदि; कारंजा सरपंच संघटणे कडून नितीन पाटील उपाध्ये यांची प्रमुख उपस्थीती**

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:** महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त माजी प्राचार्य ;जेष्ठ पत्रकार; सा योग योगेश्वरचे मुख्य संपादक अशोकराव उपाध्ये यांचा त्यांचे जन्मदिनी ब्रम्हाकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या प्रमुख संचालिका राजयोगी बीके मालती दिदि; कारंजा तालूका सरपंच संघटणेचे अध्यक्ष नितीन पाटील उपाध्ये यांनी सा . योग योगेश्वर प्रथम अंकाचे ऑन लाईन विमोचन करित अशोकराव उपाध्ये यांचा पुष्पगुच्छ देऊन दि ५ मार्च रोजी एका छोट्या कार्यक्रमात त्यांचे निवासस्थानी ईश्वरीय परीवारा सह सन्मान केला .




याप्रसंगी ग्राम काजळेश्वर प्रमुख नितीन पा उपाध्ये; ख वि कारंजाचे संचालक विनोद पाटील उपाध्ये; राजे गृप प्रमुख ओमप्रकाश वानखडे;आदर्श शेतकरी तथा व्यावसाई संदीप उपाध्ये समाज सेवी सुरेश मालठाणे; ईश्वरीय केंद्राच्या गीता पाठशाला प्रमुख राजयोगी मालती दिदि; राजयोगी डॉ निखील भाई; राजयोगी विश्वनाथ पा ताथोड; ब्रम्हा कुमारीज केंद्राच्या बहना; भाई लोग यांची उपस्थीती होती . सा . योग - योगेश्वर वृत्तपत्र सकारात्मक पत्रकारीतेची नवी दिशा घेवून प्रसीद्ध होत असल्याचा आनंद राजयोगी मालती दिदि यांनी व्यक्त केला . अमरावती ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या झोनल प्रमुख राजयोगी सिता दिदि; बहूजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडू भाऊ इंगोले; गुरुदेव सेवा संघाचे विजय खंडार; गोवींद स्कुलचे प्रमुख किरण चौधरी; कारंजा तालुक पत्रकार संघातर्फे सचिव पत्रकार ज्ञानेश्वर घुडे; ग्रामीण पत्रकार संघाचे सचिव राहूल गावंडे; काजळेश्वरवासी तर्फे सरपंच नितीन पा उपाध्ये यांनी वृत्तपत्रासाठी शुभेच्छा व्यक्त केल्यात व राज्य शासनाने गौरवित केलेल्या माजी प्राचार्य पत्रकार अशोकराव उपाध्ये यांचा सन्मान केला . अनेक चाहत्यानी मेसेजेस द्वारा शुभेच्छा दिल्याता .सर्वाना अल्पोपहार देऊन संपादक योगेश उपाध्ये यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली .

## नानेगाव ग्रामसतांच्या वतीने महापौर सौ हिमगौरी ताई आडके यांचा सत्कार

महाराष्ट्र जीत

**नानेगाव प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** तळे बाबा या जागृत देवस्थान यात्रा उत्सवाच्या धार्मिक कार्यक्रमात ग्रामस्तांच्या वतीने नानेगाव चीं सून असलेल्या महापौर हिमगौरी आडके यांचा सन्मान करण्यात आला.नानेगाव हे सह्याद्री च्या कुशीत व दारणा नदीच्या तिरावर वसलेले असून कुस्ती व वारकरी संप्रदाय जपलेले संस्कारी गाव आहे.या यात्रेत पंचक्रोशी तील सुमारे साथ हजार लोक महाप्रसादाचा लाभ घेतात. आपल्या मनोगतात महापौर आडके यांनी हा माझ्या सासरचा आशीर्वाद असून येणाऱ्या सिहंस्त काळात सर्वांनी सहकार्य करावे, गाव परिसर स्वच्छ ठेवून गावाचा



आदर्श जपावा असे सांगितले. यावेळी सरपंच ज्ञानेश्वर शिंदे संजय आडके सुनील आडके हिरामण आडके रामदास आडके अभिजीत आडके रोहित आडके गोपीनाथ जाधव भजनी मंडळ गेनू दादा शिंदे उत्तम बाबा गोसावी मृदुंगाचार्य विकास आडके व सर्व भजनी मंडळ कीर्तनकार समाजभूषण हरिभक्त पारायण चैतन्य महाराज राऊत श्रीक्षेत्र कानिफनाथ गड यांचे कीर्तन झाले या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील सर्व भाविक व भक्त सहभागी झाले तसेच तळे बाबा मित्र मंडळाचे सर्व सभासदांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला पंचक्रोशीतील आलेल्या सर्व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## शिवभक्त संजय दादा भालेराव यांचे कौतुकास्पद पाऊल ; सार्वजनिक शौचालयाचे मागील ६ वर्षांपासूनचे थकीत वीज बिल स्वखर्चाने भरले

**महापौर रितू तावडे यांच्याकडून देखील शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या कार्याचे कौतुक**

महाराष्ट्र जीत

**मुंबई,(केतन भोज) :'** प्रभाग क्रमांक १२६ मधील गोळीबार रोड येथील बाल मित्र मंडळ शिवकृपा चाळ येथील सार्वजनिक शौचालयाचे मागील ६ वर्षांपासूनचे थकित लाईट बिल ६ लाख ९२००० हजार रुपये होते.ही गोष्ट फक्त बिलाची नाही,तर आपल्या जबाबदारीची आहे.सार्वजनिक शौचालय हे गरीब,कामगार आणि प्रवासी बांधवांसाठी अत्यंत गरजेचे आहे.लाईट नसल्यामुळे त्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.ही अडचड दूर करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या भावनेतूनच ही बाब शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या निदर्शनास येताच त्यांनी स्वत:ला




छत्रपती शिवाजी महाराजांचा एक मावळा समजून शिवभक्त संजय दादा भालेराव यांनी ते थकित वीज बिल स्वखर्चातून भरले.

यावेळी शिवभक्त संजय दादा भालेराव म्हणाले की,महाराजांनी आपल्याला स्वराज्य दिले. न्याय दिला आणि सर्वसामान्य जनतेची सेवा कशी करावी हे शिकवले.जर मी स्वत:ला शिवभक्त म्हणत असलो,तर मला सर्वप्रथम जनतेची सेवा करणेच आवश्यक आहे.जर मी छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा असूनही जनतेचे प्रश्न सोडवू शकत नसेन,तर मग मोठ्या थाटामाटात शिवजयंती साजरी करण्याचा मला काय अधिकार?शिवजयंती ही फक्त मिरवणूक काढण्याची किंवा घोषणा देण्याची गोष्ट नाही तर ती महाराजांच्या विचारांचे पालन करण्याची आणि त्यांच्या आदर्शांवर चालण्याची शपथ घेण्याची वेळ आहे.कारण जनतेची सेवा हीच खरी शिवभक्ती आहे असे ही यावेळी शिवभक्त संजय दादा भालेराव म्हणाले.

**महापौर रितू तावडे यांच्याकडून देखील शिवभक्त संजय दादा भालेराव यांच्या कार्याचे कौतुक**

आपल्या प्रभागातील नागरिक आणि त्यांच्या मूलभूत गरजांप्रती असलेली बांधिलकी काय असते,याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवभक्त श्री.संजय दादा भालेराव असून साईनाथ नगर रोड,शिवकृपा चाळ येथील सार्वजनिक शौचालयाचे मागील ६ वर्षांपासून थकीत असलेले ₹६,९२,८०४/- (सहा लाख ब्याण्णव हजार आठशे चार रुपये) चे वीज बिल संजय दादांनी स्वखर्चातून भरण्याचा जो निर्णय घेतला आहे,तो खरोखरच कौतुकास्पद आहे.समाजहित आणि जनसेवा हाच खरा धर्म मानून,प्रशासकीय अडथळ्यांवर मात करत त्यांनी दाखवलेली ही तत्परता वाखाणण्याजोगी आहे. अशा निस्वार्थी कार्यकर्त्यांमुळेच आपल्या परिसरातील प्रश्न मार्गी लागतात,असे यावेळी महापौर रितू तावडे यांनी म्हणत सर्व रहिवाशांच्या वतीने त्यांनी संजय दादांचे यावेळी मनःपूर्वक आभार मानले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर टप्पा 1

महाराष्ट्र जीत

**प्रशांत ठाणे :** दारव्हा. तालुक्यातील सर्व नागरिकांसाठी सुवर्णसंधी महसूल व इतर शासकीय सेवा प्रमाणे सातबारा दुरुस्ती विविध योजनांचा लाभ आरोग्य तपासणी आणि अनेक सेवा एकाच ठिकाणी एकाच दिवसात. आपल्या मंडळाच्या ठरलेल्या दिवशी उपस्थित रहा.. प्रलंबित अर्जाची प्रत सोबत आणा... सर्वांनी लाभ घ्या इतरांनाही कळवा.सर्वसामान्य जनता व शेतकरी यांच्या महसूल विभागांतर्गत क्षत्रिय कार्यालयाशी संबंधित दैनंदिन प्रश्नाचे त्वरित निराकरण करणे महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील नवीन तरतुदीची जनजागृती व प्रभावी अंमलबजावणी करणे डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे तसेच नागरिकांना single day service delivery द्वारे सेवा प्रदान करणे या उद्देशाने माहे मार्च ते मे या कालावधीत राज्यात महसूल मंडळ स्तरावर तसेच नगरपरिषद पंचायत पातळीवर "छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा 1" राबविण्यात येत आहे. शासनाच्या नियमानुसार दारव्हा तालुक्यातही मंडळ स्तरावर खालील प्रमाणे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिरामध्ये महसूल विभागाबरोबरच शासनाच्या इतर विभागाकडे प्रलंबित असलेले प्रकरणे व सेवा विषयक अर्ज तात्काळ निकाळी काढण्याचा निर्णय दारव्हा तालुक्यात प्रशासनाने घेतला आहे तसेच शिबिराच्या निमित्ताने उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी देखील करण्यात येणार आहे.




दारव्हा तालुक्यातील सर्व नागरिकांना या शिबिराचा लाभ घ्यावा खालील नमूद केलेल्या तारखेपूर्वी शासनाचे प्रतिनिधी गाव निहाय भेट देणार असून आवश्यक सेवांसाठी अर्ज सादर करावेत यापूर्वी अर्ज केले असल्यास प्रलंबित अर्जाची प्रत संबंधित संपर्क अधिकाऱ्याकडे सादर करावे..तसेच जमीन अभिलेख अद्यावतीकरण.तुकडे बंदी उलाघात प्रकरणाचा निपटारा. भूसंपादन व आकर्षित परवानगी प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव डॉक्टर अद्यावत करणे. नवीन शिधापत्रिका तयार करणे व अद्यावत करणे. आधार अद्यावत करणे व इतर संबंधित सेवा आयुष्यमान योजनेचे कार्ड तयार करणे पशुवैद्यकीय विभागामार्फत जनावरांचे लसीकरण आरोग्य शिबिर तपासणी कृती रेतन व

**आरोग्य शिबीर तज्ञ डॉक्टर मार्फत नेत्र कान घसा अस्थिरोग आधी तपासणी व उपचार तसेच महिलांच्या आरोग्यविषयक मार्गदर्शन.भूमी अभिलेख कार्यालयाकडे प्रलंबित असलेले मोजणी अर्ज प्राधान्याने निकाली काढण्यात येतील दारव्हा तालुक्यातील सर्व नागरिकांना ह्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान दारव्हा तालुक्याचे प्रशासनामार्फत राबविण्यात येत आहे.**

**राजेश पउळ**
**तहसीलदार दारव्हा**

**शिबिराचे वेळापत्रक अ.क्र. मंडळाचे नाव दिनांक.**

दिनांक.7 मार्च 2026 चिखली.
दिनांक.14 मार्च 2026 लोही.
दिनांक.10 एप्रिल 2026 लाडखेड.
दिनांक.17 एप्रिल 2026 मांगकिन्ही.
दिनांक
दिनांक 29 एप्रिल 2026 बोरी खु.
दिनांक.08 मे 2026 महागाव कसबा.
दिनांक.15 मे 2026 दारव्हा.

**प्रमाणपत्रे दाखले..**

प्रलंबित फेरफार प्रकरणे

गाव नमुना सातबारा मध्ये चुका दुरुस्ती

डिजिटल सातबारा व आठ उताऱ्याचे वाटप सदर सातबारा प्राप्त झाल्यानंतर त्यात कोणतीही चूक अथवा त्रुटी असल्यास ते नियमाप्रमाणे तात्काळ दुरुस्ती करून देण्याची कारवाई करण्यात येईल.

उत्पन्न, रहिवाशी दाखला व जातीचे प्रमाणपत्र वितरण.

विद्यार्थ्यांसाठी विविध दाखल्याचे वाटप. नॉन क्रिमिनल प्रमाणपत्र..

**सरकारी योजनेचा लाभ.**

सामाजिक अर्थसहाय्य.


योजनेचे लाभ मंजूर करणे. घरांसाठी पट्टेवाटप.

ही मोजणी अर्ज. ॲग्रीस्टॅक आणि पीएम किसान नोंदणी.

# विरार येथे बार्टी व एमसीईडीच्या संयुक्त विद्यमाने तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.), पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने एक महिना कालावधीचा डिजिटल फोटोग्राफी व व्हिडिओ शूटिंग तसेच दोन महिने कालावधीचा अप्लाईड डेटा सायन्स ॲनालिटिक्स या दोन अनिवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी विरार येथील विवा कॉलेजमध्ये उत्साहात संपन्न झाला.



या कार्यक्रमाचा उद्देश युवक-युवतींना आधुनिक तांत्रिक कौशल्ये प्रदान करून त्यांना स्वावलंबी बनवणे आणि उद्योजकतेकडे प्रेरित करणे हा आहे.

उद्घाटन सोहळ्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे प्रकल्प अधिकारी श्री. विलास साबळे, विवा कॉलेजच्या प्राचार्या डॉ. दिपा वर्मा, विवा कॉलेजचे IQAC समन्वयक डॉ. रोहन गावनकर, विभाग प्रमुख डॉ. स्नेहा मोरे, तांत्रिक प्रशिक्षक श्रीमती श्वेता येंदे आणि श्रीमती शाहीन, एम.सी.ई.डी. चे प्रकल्प अधिकारी श्री. धम्मपाल थोरात, बार्टी समतादूत श्रीमती अंजना देवकांत व श्रीमती जयश्री चौधरी, तसेच प्रशिक्षण समन्वयक श्रीमती वैशाली ढेपे आणि श्री. सचिन माळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून प्रशिक्षणार्थींना तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कौशल्यविकास साधण्याचे आणि उद्योजकतेच्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवकांना आधुनिक क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या 135 व्या जयंतीच्या शासनातर्फे करण्यात येणा-या पूर्वतयारीचा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतला आढावा

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची यंदा 135 वी जयंती साजरी होत असून राज्य शासनातर्फे भिमजयंतीच्या केलेल्या पूर्वतयारीचा आढावा आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी सहयाद्री अतिथीगृह मलबार हिल येथे आयोजित शासकिय बैठकीत घेतला. यावेळी पोलीस, रेल्वे पोलीस, मुंबई महापालिका, राज्य शासनाच्या समाज कल्याण विविध विभांगाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पुज्य भंते डॉ. राहुलबोधी महाथेरो, माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, समन्वय समितीचे नागसेन कांबळे, रिपाइंचे मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, राजेंद्र जाधव ; प्रकाश मोरे, दयाल बहादुरे, सुरेश



बारसिंग, उषाताई रामलु, कामगार नेते रमेश जाधव, प्रकाश जाधव, शिवसेनेचे नेते रवि गरुड, रिपाइंचे घनश्याम चिरणकर आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमीत्त मुंबईत चैत्यभूमी येथे, नागपुरमधील दिक्षाभुमी यासह राज्यभरांतील विविध स्मारकात राज्य शासनातर्फे पुरविण्यात येणा-या विविध सेवा सुविधा आणि सुरक्षेच्या तयारीचा ना. रामदास आठवले यांनी आढावा घेतला. मुंबईत चैत्यभूमी तसेच गोराई येथील पॅगोडा येथे भिमजयंती निमीत्त हजारो बौध्द उपासक, भिम अनुयायी भेट देतात. त्यांच्या सुरक्षेचा विविध सुख सुविधा पुरविण्याबाबत ना. रामदास आठवले यांनी माहिती घेतली. 14 एप्रिल रोजी चैत्यभूमी येथे दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात नामवंत कलाकारांसह आंबेडकरी चळवळीतील भिमशाहीरांनाही आंबेडकरी लोक कलावंताना संधी देण्याची सुचना करण्यात आली. तसेच भिमजयंती निमीत्त चैत्यभूमी येथे 14 आणि 15 एप्रिल रोजी कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी राज्य शासनातर्फे देण्यात यावी. याबाबत आपण जिल्हाधिका-यांना पत्र पाठवणार असल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

# बाबा सोनापीर उर्साला सुरुवात

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत पवित्र संदल संपन्न



महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर/सुभाष खडसे :** माहूर शहरातील सुफी संत बाबा सोनापीर दर्गाह येथे दरवर्षी मोठ्या भक्ती भावात साजरा होणाऱ्या उर्साला दि 5 रोजी सुरुवात झाली असून दुपारनंतर परचम कुशाइ ध्वजारोहण झाल्यानंतर दर्गाह चे मुतवल्ली मुजावर शेख बाबर अहमद फकीर मोहम्मद यांचे सह सज्जादा नशीन साजिद ऊल्लाह जागीरदार यांचे सह हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत बाबा सोनापीर दर्गाह मधील पवित्र मजार वर संदल सह पवित्र चादर अर्पण करण्यात आली

दरवर्षी पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात लाखो भाविक हजेरी लावतात पवित्र रमजान महिना असल्याने दररोज सायंकाळी सर्वधर्मीय भाविकांची प्रचंड गर्दी होते संदलच्या दिवशीही हजारो भाविकांनी संदल मध्ये सहभागी होऊन उर्सात आलेले आकाश पाळणे झुले लहान मुलांना खेळण्याच्या विविध कलाकृती सह शीत पेयाचे स्टॉल्स हॉटेल नाश्ता कपडे व इतर साहित्य मिळण्याचे स्टॉल्स लागल्याने आलेल्या भाविकासह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करत बालगोपाला सोबत आनंदोत्सव साजरा केला

पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात कुठलीही आणि अनुचित घटना घडू नये म्हणून तहसीलदार अभिजीत जगताप उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे मुख्याधिकारी विवेक कांदे तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश माचेवार वैद्यकीय अधीक्षक ओमप्रकाश साबळे मरावीचे अभियंता राहुल शेंडे नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार अरुणाताई सूर्यवंशी सपोनी शरद घोडके पोउपनि संदीप अन्येबोईनवाड पोउपनी पालसिंग ब्राह्मण पोऊपनि बाबू जाधव यांचे सह पोलीस होमगार्ड कर्मचारी लक्ष देऊन असून व्यवस्थापन समितीचे मुतवली मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद सज्जादानशीन साजिद उल्लाह जागीरदार तसेच आर्णी येथील अकबर भाई वसंत कपाटे विजय आमले अब्दुल जब्बार भाई इलियास बावाणी मनोज कीर्तने सय्यद झहीर भाई यांचे सह शहर परिसरातील मान्यवर मंडळी सहकार्य करीत आहे

# कसा असावा उन्हाळ्यातील आहार ?

महाराष्ट्र जीत

थंडीचा ऋतू आता संपला असून हळूहळू उष्णतेचा पारा वाढत आहे. मार्चमध्ये आल्हाददायक गारवा कमी होत जातो तसे तापमान वाढू लागते. बाहेरच्या वाढत्या तापमानाचा आपल्या शरीरावर परिणाम दिसू लागतो. उन्हाळ्यापूर्वी थंडीत आपली पचनशक्ती चांगली असते त्यामुळे उष्ण, जड पदार्थ या मौसमात आहारात सहज पचतात. पण याउलट उन्हाळ्यात शरीराची पचनशक्ती फार चांगली नसते. या काळात डीहायड्रेशन, पित्त, अपचन, डोकेदुखी अशा अनेक समस्या जाणवतात. त्यामुळे उन्हाचा कडाका वाढला की आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. चला तर मग उन्हाळ्यातील आहार नेमका कसा असावा ते पाहूया...

उन्हाळ्यात सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळे शरीरातील 'जलांश' (Water content) कमी होतो, ज्यामुळे निर्जलीकरण (Dehydration) होते. सततच्या घामामुळे तहान लागणे, तोंड कोरडे पडणे आणि थकवा अशी लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी शरीरातील द्रवपदार्थांची पातळी राखणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला आहार पाणीदार, हलका आणि थंड प्रकृतीचा असावा.

**पेय**

या ऋतूत शरीरातील पाण्याची पातळी राखणे अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे केवळ तहान लागल्यावरच पाणी पिणे पुरेसे नसते. शरीरातील खनिजे टिकवून ठेवण्यासाठी काही पेय दररोज दुपारच्या वेळी घेणे चांगले असते. जसे की, नारळ पाणी हे नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट्सचा उत्तम स्रोत आहे. शरीराला व्हिटॅमिन-सी आणि थंडावा मिळवण्यासाठी लिंबू सरबत, दह्यापेक्षा ताक उन्हाळ्यात जास्त फायदेशीर असते. त्यात थोडी जिरे पूड आणि सैंधव मीठ टाकल्यास पचनक्रिया सुधारते. दुपारच्या जेवणाआधी एक ग्लास सब्जायुक्त कोकम सरबत प्यायल्याने शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन राखले जाते. तसेच दिवसभर थंड फ्रिजमधलं पाणी पिण्यापेक्षा माठातील पाणी पिणे आरोग्यासाठी उत्तम असते. तसेच कैरीचे पन्हेही या दिवसात प्यावे.

**हंगामी फळे आणि भाज्या**



उन्हाळ्यात निसर्गाकडून आपल्याला अशी फळे मिळतात ज्यात पाण्याचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे ही फळे या ऋतूत अवश्य खावीत. जसे की, कलिंगड आणि टरबूज यात ९०% पेक्षा जास्त पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवते. याशिवाय संत्री, द्राक्षे, पपई इत्यादी फळेही चांगली असतात. काकडी शरीरातील उष्णता कमी करण्यास मदत करते. त्यामुळे दुपारच्या जेवणात दही घालून काकडीची कोशिंबीर अवश्य खावी. पालक, मेथी, पुदिना या पालेभाज्या आणि दुधी भोपळा, पडवळ, कारले आणि कोबी यांसारख्या पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या भाज्या खाव्यात. उन्हाळ्यात कच्चा कांदा खाणे खूप फायदेशीर असते, यामुळे उष्माघातापासून संरक्षण होते. पित्ताची समस्या असेल तर काकडीचा आणि दुधीभोपळ्याचा रस एकत्र प्रमाणात मिसळून त्यामध्ये सैंधव मीठ टाकून प्यावा. यामुळे गॅस नियंत्रित राहातो आणि पचनक्षमता उत्तम बनते. उन्हाळा हा ऋतू म्हटला म्हणजे आंबे आलेच. मात्र आंबे खाण्याबाबत थोडी सावधगिरी बाळगावी. आंबे खाण्यापूर्वी दोन तास आधी ते पाण्यात ठेवावे आणि मगच ते खावे. यामुळे उष्णता बाधत नाही. उन्हाळ्यामध्ये दुपारी जेवताना हिरव्या चटण्यांचे सेवन करावे. म्हणजे कोथिंबीर, पुदिना, आवळा, कांदा इत्यादीची चटणी खावी. यामुळे जेवणाचा स्वादही वाढतो आणि आहार ऋतूनुरूपही बनतो.

**गुलकंद**

गुलाबाच्या पाकळ्यांपासून बनवलेला गोड पदार्थ म्हणजे कुलकंद. उन्हाळ्यात रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात गुलकंद घालून घेतल्याने शांत झोप लागते. दूध गुलकंदामुळे शरीराला नैसर्गिक थंडावा मिळतो.

**दहीभात**

दक्षिण भारतात रोजच्या जेवणात दहीभात हा आवश्यक पदार्थ आहे. दह्याचे सेवन पोटासाठी उत्तम असते. उन्हाळ्यात दुपारच्या जेवणात दहीभाताचा समावेश करावा किंवा संध्याकाळी भूक लागल्यावरही ते खाऊ शकता. लहान मुलांनाही दहीभात द्यावा. दहीभाताने पचनक्रिया सुधारते.

**सकाळचा नाश्ता**

या ऋतूत सकाळचा नाश्ता करणे गरजेचे असते. सकाळी नारळपाणी, फळे किंवा फळांचा रस घ्यावा. जास्त भूक असल्यास तुम्ही पोहे, उपीट असे हलके पदार्थ देखील खाऊ शकता.

**दुपारचे जेवण**

दुपारी पोळी- भाजी, कोशिंबिरी, चटण्या, दहीभात, लस्सी किंवा ताक आणि हिरव्या पालेभाज्या यांचा आहारात समावेश करा. तसेच ज्वारीची भाकरी किंवा नाचणीचे सत्व खाल्ल्यास शरीराला थंडावा मिळतो.

**संध्याकाळचा नाश्ता**

संध्याकाळच्या वेळी मुरमुरे, भेळ असे काही खावे किंवा मुळा, गाजर किंवा काकडीचे सॅलेडही खाऊ शकता. याशिवाय थंड पेय घ्यावीत. लिंबूपाणी आणि ताक हे केव्हाही फायदेशीर ठरतात.

**रात्रीचे जेवण**

रात्रीचे जेवण या दिवसात अतिशय हलके ठेवावे. यावेळी सॅलेड आणि भाज्या जास्त प्रमाणात खाव्यात. पोळी खाणार असाल तर दुपारच्या जेवणापेक्षा एक पोळी कमी खावी.

**हे टाळा**

■ या दिवसात मांसाहार, मद्यपान टाळावे. कारण हे पदार्थ उष्णता वाढवणारे असतात.

■ उन्हाळ्यात पचनशक्ती कमकुवत होते, त्यामुळे एकाच वेळी भरपेट जेवण्याऐवजी थोडे थोडे खावे.

## ग्रामीण रुग्णालय, मुदखेड येथे रुग्णांना निकृष्ट दर्जाचे अन्न; चौकशीची मागणी

**मुदखेड | प्रतिनिधी** : मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या अन्नाच्या दर्जाबाबत गंभीर तक्रार करण्यात आली असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिवसेना राज्य ग्रंथालय सेल (वाचनकक्ष) विभागाचे जिल्हा सरचिटणीस बालाजी गडककर यांनी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना लेखी निवेदन सादर करून ग्रामीण रुग्णालयातील अन्नपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रत्यक्ष निवेदन देण्यात आले.

सादर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण रुग्णालयात दाखल रुग्णांना दिले जाणारे जेवण, नाश्ता व आहार अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून त्यात आवश्यक पोषणमूल्यांचा अभाव आहे. शासनाकडून एका रुग्णाच्या जेवणासाठी दररोज सुमारे १४० रुपये मंजूर असताना प्रत्यक्षात दिल्या जाणाऱ्या अन्नाची गुणवत्ता अत्यंत खालावलेली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांनी रुग्णालयाला भेट देऊन अन्नव्यवस्थेची पाहणी केल्याचा दावा केला



असून संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार सुरू असल्याचेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

काही ठिकाणी संगनमताने गैरव्यवहार होत असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून अन्नपुरवठा करणाऱ्या कंत्राटदारासह संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, तसेच रुग्णांना दर्जेदार व पोषक आहार उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांनी निवेदन स्वीकारून प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिल्याचे समजते.

या तक्रारीमुळे ग्रामीण रुग्णालयातील कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कापूस वेचणी यंत्राद्वारे होणार

### कापूस वेचणी यंत्राचे प्रात्यक्षिक आयोजन संपन्न

**नागपूर** : २७ फेब्रुवारी रोजी कापूस वेचणी यंत्राचे प्रात्यक्षिक आयोजन करण्यात आले. कापूस वेचणी करिता असलेला मजुरांचा तुटवडा व वेचणी खर्च कमी करण्यासाठी यांत्रिक कापूस वेचणीचे प्रात्यक्षिक कॉनफेडरेशन ऑफ इंडियन टेक्स्टाईल इंडस्ट्री (CITI CDRA) द्वारे CICR व शक्तिमान ॲग्रो यांचे संयुक्तरीत्या CICR नागपूर येथे नुकतेच करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. जयंत मेश्राम वरिष्ठ शास्त्रज्ञ सीआयसीआर यांनी केले. डॉ.अर्जुन तायडे प्रमुख शास्त्रज्ञ यांनी कापूस वेचणी करिता मजुराची टंचाई व वेचनी करिता लागणारा साधारण १२ ते १५ रुपये प्रती किलो खर्च, यावर यांत्रिक वेचनि उपाय आहे. गोविंद वैराळे प्रकल्प समन्वयक (CITI CDRA), यांनी अतिघन कापूस लागवड पद्धतीमुळे कापसाचे उत्पादन वाढले आहे. यांत्रिक वेचनी यंत्राचा अतिघन लागवडीसाठी उपयोग



होईल. डॉ.विजय वाघमारे संचालक केन्द्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर, यांनी शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा लाभघ्यावा, कापूस वेचणी यंत्राचा वापर करणे, हे शेतकऱ्याना, कापूस वेचणीसाठी पुढील काही काळात उपलब्ध होईल. कापूस संशोधन संस्था शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी, वेळोवेळी मार्गदशन करित आहे. डॉ. सीडी मायी माजी अध्यक्ष, कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळ दिल्ली, यांनी सल्ला दिला की अधिक किमतीचे यंत्र लहान शेतकऱ्यांना खरेदी करणे आर्थिक दृष्ट्या परवडत नसल्याने शेतकऱ्यांनी त्यांच्या ग्रुपद्वारे, शेतकरी उत्पादक कंपनी करून त्याचा वापर करावा. डॉ.रामकृष्ण ज्येष्ठ वैज्ञानिक, डॉ.जयंत मेश्राम, डॉ.के. पांडीयन, डॉ.शैलेश गावंडे तसेच राशी सीडचे मयूर खेत्रे, शक्तिमान चे किशोर वाघ, डॉ.राव यांनी कापूस उत्पादन वाढीसाठी व तांत्रिक कापूस वेचणी बाबत मार्गदर्शन केले. कापूस संशोधन संस्था पांजरी नागपूर येथे, शक्तिमान कापूस वेचणी यंत्राद्वारे कापूस वेचणीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. डॉ.एस के शुक्ला डायरेक्टर, सिरकोट मुंबई, यांनी स्वच्छ आणि नीरभेळ कापसाचे महत्त्व अधोरेखित केले, यंत्राद्वारे कापूस वेचल्यानंतर त्यामध्ये कचरा जास्त असतो त्यामुळे कचरा विरहित प्रक्रियेसाठी, अत्याधुनिक जिनिंग प्रेसिंग ची व्यवस्था आवश्यक आहे. डॉ.एस.व्ही.सरोदे माजी संचालक, डॉ.प.दे.कृ.वि.अकोला, यांनी वेचनीच्या खर्च शेतकऱ्यांना जास्त येतो मजूर मिळत नाही, वेचनीकरता मशीन शेतकऱ्यांना फायदेशीर ठरते असे प्रतिपादन केले. शक्तिमान चे कापूस वेचणी यंत्राद्वारे कापूस वेचणीचे सीआयसीआर चे फिल्ड मध्ये, कापूस वेचनीचे प्रात्यक्षिक करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयंत मेश्राम यांनी केले तर आभार डॉ. बाबासाहेब फंड, यांनी मानले.

या कार्याक्रमाच्यावेळी महादेव चंद्रभान गावंडे ता.पारशिवनी जि.नागपूर, उमेश अजाबराव वाघमारे ता. काटोल जि.नागपूर, ज्ञानेश्वर सोनटक्के मु. कवठा जि.नागपूर, दिलीप विश्वेश्वर ठाकरे ता. सेलू जि.वर्धा, खुशाल महादेव कानकाटे ता.हिंगणघाट जि.वर्धा या पाच प्रगतीशील शेतकऱ्यांना मानचिन्ह व श्रीफळ देवून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास CITI CDRA नागपूर चे प्रकल्प अधिकारी युगांतर मेश्राम व वर्धा चे प्रकल्प अधिकारी अमित कवाडे आणि इतर कर्मचारी वर्ग व शेतकरी मोठ्या प्रमाणात प्रात्यक्षिक पाहण्यासाठी उपस्थित होते.

## मानोरा येथे जेष्ठ नागरिक आणि अपंग साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

### खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या हस्ते साहित्य वाटप

**मानोरा तालुका प्रतिनिधी** : तालुक्यात नोंदणी केलेल्या दिव्यांग बंधू भगिनी तसेच 60 वर्षा वरील जेष्ठ नागरिक यांना सहायभूत साधनाचे ADIP(अपंग व्यक्तींना सहाय्यक उपकरणे) आणि RVV(राष्ट्रीय वयोश्री योजना) अंतर्गत साहित्य वाटप झाले आहे माननीय खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उदघाटन आणि साहित्य वाटप झाले आहे. मागील वर्षी दिव्यांग बांधवांची नोंदणी करण्यात आली होती तरी आता सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व मुंबई जिल्हा प्रशासन – यवतमाळ व वाशिम



यांच्या वतीने साहित्य वाटप झाले आहे तरी त्या मध्ये व्हील चेअर,श्रवणयंत्र, काठी,वॉकर,ट्रायसायकल आदि साहित्य वितरण होणार झाले आहे या मध्ये जेष्ठ नागरिक 162 तर दिव्यांग 16 असे एकूण 178 पुरुष आणि महिला यांनी लाभ घेतला आहे तसेच खासदार संजय भाऊ देशमुख यांचा सत्कार पंचायत समिती गटविकास अधिकारी जाधव यांनी केला या वेळी उपस्थित रवी पवार तालुका प्रमुख शिवसेना(उबाठा),विजय अनंतकुमार पाटील माजी सदस्त पंचायत समिती,प्रकाश राठोड माजी अध्यक्ष तांडा सुधार वस्ती वाशीम,प्रा. राजेंद्र पाटील म्हातारमारे नगरसेवक नगर पंचायत मानोरा,डॉ. विठ्ठल घाडगे,ओंकार राठोड, महेश पाटील,माजी उपसभापती पंचायत समिती मानोरा, संतोष पुरी शहर प्रमुख शिवसेना(उबाठा),नितीन खुपसे, शिवा अंधारे युवासेना तालुका प्रमुख, देवा कुऱ्हाडे युवासेना उपतालुका प्रमुख मानोरा, नितीन पाटील युवासेना उपजिल्हा प्रमुख कारंजा-मानोरा, गोपाल गावंडे हवामान् तज्ञ आणि इतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते..

## विज्ञानाच्या पलीकडे फक्त आणि फक्त विज्ञानच असते

**भंडारा प्रतिनिधी** : विज्ञानाच्या पलीकडे फक्त आणि फक्त विज्ञानच असते बाकी कुठलेही भूत भानामती लावडीन चेटकिन मंत्र तंत्र जादूटोणा फोकनाड अध्यात्म त्याच्यामागे दडलेले नसते असे प्रतिपादन ग्यानचंद ताराचंद जांभुळकर यांनी दि. 28 फेब्रुवारी ला राष्ट्रीय विज्ञान दिन या कार्यक्रमांत समर्थ विद्यालय लाखनी येथे बोलताना केले. या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विभावरी निखाडे होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त तहसीलदार राजेश मडामे व लीचडे सर तसेच प्रा. सतीश भोवते हे सुद्धा उपस्थित होते.

जांभुळकर पुढे बोलताना म्हणाले की विद्यार्थ्यांनो बुवाबाजीच्या फंदात पडू नका फसवणारे लोक या जगामध्ये खूप आहेत तुम्ही विज्ञान युगामध्ये जगता तुम्हाला चिकित्सक बनले पाहिजे. आपल्याला फसवणारे लोक खूप आहेत त्यांची चालाकी आपण ओळखले पाहिजे. विज्ञानाने आपले जीवन समृद्ध केलेले आहे




शोध वृत्ती आपल्या मनामध्ये असावी अपयशाने खचून जाऊ नये थॉमस अलवा एडिसिन यांनी 1032 वेळा बल्बचा शोध लावण्यासाठी प्रयत्न केले. परंतु तो पूर्णपणे सफल झाला नाही तेव्हा त्याला मदत करणारे त्यांचे मित्र त्याला सोडून गेले आम्हाला तुझ्यासोबत काम करण्याची इच्छा नाही एवढे प्रयत्न करून आम्हाला काहीही मिळाले नाही तेव्हा मित्रांनो एडिसन यांचे उत्तर सामाजिक व मानव कल्याणासाठी काय होते,? एडिसन मनाला आपण १०३२ मार्ग शोधून काढलेले आहेत .या जगामध्ये जो कोणी बल्बचा शोध लावण्यासाठी या प्रकारचा प्रयत्न करेल तर त्यांना आपण सांगू की आम्ही या मार्गाने पहिल्यांदाच गेलेले आहोत तुम्ही या मार्गाने जाऊन आपला पैसा वेळ श्रम वाया घालवू नका. दुसरं काहीतरी करा एवढे मानव कल्याणाचे विचार एडिसन यांच्यामध्ये होते पण शेवटी 10३३ नंतर त्यांना बल्बचा शोध लागला हे मानव जातीचे कल्याण आहे .मित्रांनो म्हणून विज्ञानाच्या पलीकडे विज्ञानाच असते.

विज्ञानाच्या पलीकडे विज्ञान असते हे पटवून देण्यासाठी जांभूळकर यांनी विद्यार्थ्यांना काही वैज्ञानिक प्रयोग करून दिले जसे हातावर कापूर जाळणे व ते जिभेवर घेणे, लिंबू मधून वस्तू काढणे ,लिंबू मधून रक्त काढणे, तांदळाने भरलेला लोटा पॅचकसने उचलणे, चिठ्ठी मधील नावे ओळखणे कानाला लावून, रुमालेची गाठ सोडणे, जिभेला स्पोक टोचणे ,नारळातून वस्तू काढणे, इत्यादी प्रयोग करून अंधश्रधा बाळगू नका असे सांगीतले .विद्यार्थ्यांनी या सुंदर कार्यक्रमास प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन वर्ग ११ वी विज्ञान ची विद्यार्थिनी कु तनवी बडवाईक नी केले कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## सावधान! कर्ज फेडले तरी छळ थांबेना

### घाटंजीच्या तरुणाला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी

**घाटंजी तालुका प्रतिनिधी** : मोबाईलवरील 'लोन ॲप' (कर्ज देणारे ॲप) किती धोकादायक ठरू शकतात, याचा एक धक्कादायक प्रकार घाटंजीमध्ये समोर आला आहे. घेतलेले कर्ज व्याजासह पूर्ण परत करूनही, एका तरुणाला आणि त्याच्या कुटुंबाला अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल केले जात आहे.

**काय आहे नेमकी घटना?**

घाटंजी येथील रहिवासी नीरज मन्ने यांनी २६ फेब्रुवारी रोजी एका मोबाईल ॲपवरून कर्ज घेतले होते. हे कर्ज त्यांनी ३ मार्च रोजी पूर्णपणे फेडले. मात्र, कर्ज फेडल्यानंतरही त्यांचा छळ थांबलेला नाही.

**अशा प्रकारे दिला जातोय त्रास:**

परदेशी नंबरवरून धमक्या: गेल्या दोन दिवसांपासून नीरज यांना पाकिस्तान (+९२), इंग्लंड (+४४) अशा विविध देशांच्या नंबरवरून व्हॉट्सॲप कॉल येत आहेत.

फोटोशी छेडछाड: "पैसे दिले नाहीत, तर तुझे आणि तुझ्या घरातील महिलांचे फोटो खराब (एडिट) करून तुझ्या नातेवाईकांना पाठवू," अशी धमकी हे लोक देत आहेत.

संपर्क क्रमांक हॅक: या टोळीने नीरज यांचा मोबाईल डेटा हॅक केला असून, त्यांच्या फोनमधील सर्व नातेवाईकांचे नंबर चोरले आहेत. हे फोटो सर्वांना पाठवण्याची भीती दाखवून ते पुन्हा पैशांची मागणी करत आहेत.

**सायबर पोलिसांत धाव:**

या सततच्या त्रासामुळे नीरज मन्ने आणि त्यांचे कुटुंब प्रचंड मानसिक दडपणाखाली आहे. अखेर त्यांनी यवतमाळ सायबर सेल आणि घाटंजी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार देऊन कारवाईची मागणी केली आहे.

**लोकांसाठी महत्त्वाची टीप:** कोणत्याही अनोळखी मोबाईल ॲपवरून कर्ज घेऊ नका. हे ॲप्स कर्ज देताना तुमच्या फोनमधील फोटो आणि नंबर चोरतात आणि नंतर ब्लॅकमेल करतात. अशी फसवणूक झाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

## आठवले साहेबांची लोकसभेबरोबर राज्यसभेतही हॅट्रिक!

माननीय नामदार रामदासजी आठवले साहेबांची राज्यसभेची आज हॅट्रिक झाली. माननीय नामदार रामदासजी आठवले साहेब यांची राजकीय कारकीर्द पाहिल्यानंतर खरंतर कौतुक आणि हेवा वाटतो. सर्वसामान्य माणसांचा व संघटनेचा नेता, आंबेडकरी विचाराच्या दलित पॅंथर तथा भारतीय दलित पॅंथर संघटनेच्या मूशीतून तयार झालेले नेतृत्व. सुरुवातीला राज्यात कॅबिनेट मंत्री व नंतर विधान परिषद सदस्य त्यानंतर मुंबईसारख्या प्रांतामधून लोकसभेतील खासदार आणि दोनदा पंढरपूर मधून खासदार. लोकसभेच्या तीन टर्म करणारा आंबेडकर समूहातील नेता त्याचबरोबर वरिष्ठ सभागृह राज्यसभेचे त्यामध्ये दोन टर्म केंद्रीय राज्यमंत्री पदासह आणि आता तिसऱ्या राज्यसभा टर्मला सुरुवात होते. लोकसभेतील खासदार म्हणून हॅट्रिक आणि आता राज्यसभेतील खासदार म्हणून हॅट्रिक हा एक विक्रम राजकीय पटलावर आठवले साहेबांनी केलेला दिसून येतो. एकूणच आंबेडकरी चळवळीतील आणि रिपब्लिकन नेतृत्वांचा संसदीय प्रक्रियेतील सहभाग लक्षात घेता सर्व नेत्यांना मागे सारून आज एक राजकीय उच्चांक गाठण्याचे मोठं काम आठवले साहेबांच्या रूपाने झालेल आहे. विधानभवनाच्या



पायरीवर आपला फॉर्म भरून येत असताना भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, ही एकूणच विधान भवन हादरून सोडणाऱ्या कार्यकर्त्यांच्या घोषणांनी वातावरण आंबेडकरमय केलं. महायुतीच्या राजकीय नेत्यांच्या बैठकीमध्येही आठवले साहेबांच्या कवितेने वातावरण निर्मिती केली आणि आपल्या कुमार शैलीमध्ये प्रसारमाध्यमासमोर भूमिका मांडत असताना मागासवर्गीय समुदायांबरोबर राज्य आणि देशाच्या विकासाच्या संदर्भात व्यापक भूमिका त्यांनी मांडली. एकूणच दोन-तीन तासाच्या त्यांच्या वावराने विधानभवनाच्या परिसरामध्ये वातावरणाचा एकदम नूर पालटून गेला. या सगळ्यांमध्ये एवढं मोठं राजकीय करियर उभा करणारा सामान्य माणूस जसा आहे तसाच लोकांच्या मध्ये उभा होता. प्रसार माध्यमाचा आवडता माणूस आणि सर्वपक्षीय नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणारा त्याचबरोबर सामान्य लोकांशीही आनंदाने हस्तांदोलन करणारा नेता ही त्यांची ओळख आणि प्रतिमान कायम ठेवत पुढे निघाले होते. खरोखरच आठवले साहेबांच्या नेतृत्वाला आणि त्यांनी एक राजकीय करिअरची उंची गाटत असताना लोकसभेतील आणि राज्यसभेतील हॅट्रिक केल्याबद्दल सार्थ अभिमान वाटला. आठवले साहेब आगे बढो हम आपके साथ है!असं म्हणत त्यांच्यासोबत काम केल्याचा आणि आपलं थोडं फार योगदान देण्याचं काम केल्याबद्दल ही मनाला धन्यता वाटली.

**जय भीम जय भारत!**
**प्रवीण मोरे**
**रिपब्लिकन सामाजिक कार्यकर्ता**
**दिनांक ५ मार्च २०२६**

## सावळेश्वर ट्रॅक्टर्सची वर्षभरात यशस्वी वाटचाल दुसऱ्या वर्षात पदार्पण केक कापून आनंदोत्सव साजरा

**बीड आष्टी प्रतिनिधी** : शून्यातून विश्व निर्माण करून उद्योग जगतामध्ये गगन भरारी घेत शेकडो नागरिकांच्या हाताला काम मिळवून देणारे,स्वकर्तत्वावर आपले वेगळे स्थान निर्माण करणारे उद्योजक आयडॉल असणारे रमेश दादा आजबे पाटील यांच्या सावळेश्वर उद्योग समूहाचे आष्टी शहरातील सावळेश्वर ट्रॅक्टर्स या स्वराज कंपनीच्या भव्य ट्रॅक्टरचा शुभारंभ मागील वर्षी शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला होता. विशेष आकर्षक ग्राहकांना सवलत व तत्पर सेवा दिल्याने आष्टी तालुक्यात स्वराज ट्रॅक्टर ला मोठी मागणी वाढली अन जिकडे-तिकडे स्वराज ट्रॅक्टरच ग्राहकांनी खरेदी करण्यास पसंती दिल्याने सावळेश्वर ट्रॅक्टरने कंपनीने ठरवून दिलेल्या टार्गेटचा टप्पा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टरचे विक्रमी विक्री करून गावागावात शोरूमचे व कंपनीचे नाव पोहोचले आहे. ग्राहक राजांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल सावळेश्वर ट्रॅक्टर चे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी ग्राहकांचे आभार मानले पहिल्या वर्धापन दिन मेहनत घेणाऱ्या सर्व स्टाफ कर्मचाऱ्यांसोबत केक कापून




आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले त्यांनी आष्टी शहरात मागिल वर्षी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला. अनेक ट्रॅक्टरच्या विविध कंपन्या असून वार्षिक ट्रॅक्टर विक्री करण्यासाठी डीलरला टारगेट दिले जाते.हे टारगेट पूर्ण नाही झाले तर काही कंपन्या डीलर कडून डीलरशिप देखील काढून घेतात असे प्रसंग अनेक वेळा पाहायला मिळतात परंतु याला अपवाद आहे. ते म्हणजे सावळेश्वर ट्रॅक्टर वर्षभर भव्य बंफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या १ वर्षात ४४४ स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.

दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.

**तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत.**

**आमच्या शोरुमच्या वर्धापनदिनानिमित्त सर्व प्रिय ग्राहक आणि हितचिंतकांचे मनापासून आभार! तुमचा अमूल्य विश्वास आणि पाठिंबा हाच आमच्या यशाचा आधार आहे. गेल्या वर्षांपासून तुमच्या सेवेसाठी तत्पर राहून, तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत. भविष्यातही उच्च दर्जाची तत्पर सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**

**- रमेश दादा आजबे (सावळेश्वर ट्रॅक्टर्स धोंडे पेट्रोल पंपा समोर नगर रोड आष्टी )**